# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/MCM/२०१५/2316

दिनांक 16 SEP 2015

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर, अभियांत्रिकी, मॅनेजमेन्ट, औषधनिर्माणशास्त्र इ. उच्च व तंत्रशिक्षण संस्था
अमरावती विभाग.

**विषय :- केन्द्र शासनाच्या Merit-Cum-Means शिष्यवृत्तीची जाहिरात संस्थेच्या दर्शनिय भागात सूचनाफलकावर लावणेबाबत व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणेबाबत.**

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाव्दारा प्रसिध्द अधिसूचना क्र.१८/DTE/MCM/२०१५/१२९ दिनांक. १४/७/२०१५.

या विभागातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना-अनुदानित, उच्च व तंत्रशिक्षण पदवी / पदव्युत्तर पदवी संस्थांच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून केन्द्र शासनाच्या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल (National Scholarship portal) व्दारे अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचे अर्ज स्विकारले जाणार असून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सकंतस्थळावर State Govt. Scholarship या लिंगमध्ये वरील संदर्भीय अधिसूचना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर अधिसूचनेचे सर्व सहा (०६) पान प्रिन्ट करुन संस्थेच्या दर्शनी भागातील सूचनाफलकावर लावण्यास सूचना देण्यात आली होती. परंतू दिनांक २५/८/२०१५ रोजी शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे आयोजित शिष्यवृत्ती पोर्टल च्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये चौकशी केली असता अमरावती विभागातील फक्त दोन संस्थांनी सदर अधिसूचना संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिध्द केल्याचे निदर्शनास आले.

तरी या परिपत्रकाव्दारे विभागातील सर्व संस्थांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय अधिसूचनेचे प्रिन्टआऊट काढून प्रत्येक विभागातील सूचनाफलकावर लावून याबद्दलचे योग्य ते मार्गदर्शन पात्र विद्यार्थ्यांना विहित मुदतीच्या आत करावेत आणि कोणतेही पात्र विद्यार्थी लागू असलेल्या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची कटाक्षाने दखल घ्यावी.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.